# ANNEXURE

# III

# Government Institue

शासकीय महाविद्यालयांना संलग्नता प्रमाणपत्र मिळविण्याकरीता व संलग्नता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्याकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कातून सूट देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

शासन निर्णय क्रमांक.एमईडी-१०२३/प्र.क्र.३२१/शिक्षण-२

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१

दिनांक:- १०/०८/२०२३

संदर्भ:-

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवस/ मआविवि/ संलग्नता शुल्क/ माफ/ २०२३/ २५८, दिनांक ०७/०८/२०२३.

<u>प्रस्तावना :-</u>

आरोग्य विज्ञानाचे वैद्यकीय, दंत, आयुष, फिजिओथेरपी व नर्सिंग इत्यादी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यासाठी राज्यातील सर्व महाविद्यालयांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त करणे, संलग्नता प्रमाणपत्र मिळविणे व सदर प्रमाणपत्राचे दरवर्षी नूतनीकरण करुन घेणे आवश्यक असून सदर संलग्नता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी व संलग्नता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यासाठी विद्यापीठास शुल्क अदा करावे लागते. सदर महाविद्यालयांमध्ये विभागाच्या नियंत्रणाखालील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा देखील समावेश आहे.

२. दरवर्षी विभागाच्या नियंत्रणाखालील विविध शासकीय वैद्यकीय, दंत, आयुष, फिजिओथेरपी, नर्सिंग इत्यादी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना नविन संलग्नता प्रमाणपत्राकरीता व नूतनीकरणाकरीता मोठ्या प्रमाणावर विद्यापीठास रक्कम अदा करावी लागते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीचे शुल्क हे खाजगी/ विनाअनुदानित/ अभिमत विद्यापीठांच्या तुलनेत अतिशय नगण्य असून सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्याकरिता आवश्यक असणारा खर्च प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या शासनामार्फत करण्यात येत असतो.

Scanned with CamScanner

३. उपरोक्त बाबी विचारात घेऊन विविध शासकीय महाविद्यालयांकरीता नवीन पदवी महाविद्यालय सुरु करणे/ नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे/ पदवी-पदव्युत्तर विद्यार्थी क्षमतेत वाढ करणे याकरीता आरोग्य विज्ञानाच्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना नवीन संलग्नता प्रमाणपत्र मिळविण्याकरीता व संलग्नता प्रमाणपत्राचे नूतनीकरण/ संलग्नीकरणाचे विस्तारीकरण इत्यादी करीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या संलग्नीकरण शुल्कातून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णयः-**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ५ (डब्ल्यूडब्ल्यू) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन, विभागाच्या नियंत्रणाखालील विविध शासकीय आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून संलग्नता प्रमाणपत्र मिळविण्याकरीता व संलग्नता प्रमाणपत्राचे नूतनीकरण/ विस्तारीकरण करण्याकरीता विद्यापीठाकडून आकारण्यात येणा-या संलग्नीकरण शुल्कातून याव्दारे सूट देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८१०१७४५४९१४१३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TUKARAM SASULKAR

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई



Scanned with CamScanner

६. मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
९. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१५. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
१६. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
१७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१८. अधिष्ठाता (सर्व), शासकीय वैद्यकीय/ दंत/ आयुष/ फिजिओथेरपी/ नर्सिंग महाविद्यालये (संचालनालयामार्फत)
१९. निवडनस्ती (शिक्षण-२)



Scanned with CamScanner